# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर वसई विरार यांचे कार्यालय,

## रामनगर, सृष्टी, मिरारोड पुर्व. ता. जि. ठाणे

दुरध्वनीक्रमांक ०२२-२९४५१००१

Mail:cpoffice.mb-vv@mahapolice.gon.in


**प्रेसनोट क्र ३५९** **दिनांक- २७/१२/२०२१**

### जबरी चोरीचा खोटा गुन्हा नोंद केल्याची उकल करण्यास काशिमीरा पोलीस ठाण्यास यश.

काशिमीरा पोलीस ठाणे येथे दिनांक २०/१२/२०२१ रोजी तक्रारदार नामे अमृत उदयकुमार तानावडे, वय. २५ वर्ष, रा. रुम नं. बी २/४०३, सुंदर सागर अपा., बेवर्ली पार्क, मिरारोड पूर्व ता. जि. ठाणे याने पोलीस ठाण्यात येवून कळविले की, दि. १९/१२/२०२१ रोजी रात्रौ १२.३० वाजताचे सुमारास ते ठाणे येथून कामावरुन पायी परत येत असतांना अहमदाबाद मुबंई हायवे रोडवर घोडबंदर खिंड येथे अंधारात रस्त्यावर त्यांना तीन अनोळखी आरोपीत इसमांनी चाकुचा धाक दाखवून फिर्यादी यांचे ताब्यातील ५२० रु रोख रक्कम, ७,०००/- रु किंमतीचा रेडमी नोट ०९ मोबाईल फोन व ०७,०००/- रु किं. चा ओप्पो ए १६ मोबाईल फोन असा एकुन १४,५२०/- रु किं चा मुददेमाल जबरीने चोरी करुन नेला आहे. फिर्यादी यांनी नमुद केलेल्या जबरी चोरीच्या प्रकारानंतर काशीमीरा पोलीस ठाणे येथे दि. २०/१२/२०२१ रोजी गु.र.नं. I ८७२/२०२१ कलम ३९२, ३४ भा.द.वि. अन्वये तात्काळ गुन्हा नोंद करण्यात आला होता.

नमुद गुन्हयाचा प्रकार हा गंभीर स्वरुपाचा वाटल्याने सदर गुन्हा हा लवकरात लवकर उघडकीस आणणेबाबत वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी सुचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे दाखल गुन्हयाचा तपास गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार हे करीत असतांना फिर्यादी यांचे जबरी चोरीस गेलेल्या ०२ मोबाईल हॅण्डसेटचे तांत्रीक विश्लेषणाचे आधारे तपास केला असता फिर्यादी यांचा जबरी चोरीस गेलेला रेड मी कंपनीचा मोबाईल फोन हा माहे जुन २०२१ पासून त्रयस्थ व्यक्ति वापरत असल्याची खात्रीलायक माहीती समोर आली. सदर गुन्हयातील फिर्यादी हे काहीतरी माहिती लपवत असल्याचा संशय आल्याने फिर्यादी यांना विश्वासात घेवून त्यांचेकडे गुन्हयाच्या घडले प्रकाराबाबत कौशल्यपुर्वक तपास केला असता त्यांचा रेड मी कंपनीचा मोबाईल फोन हा गेल्या ०७ ते ०८ महिन्यापूर्वी मिरारोड ते चर्नीरोड या रेल्वेप्रवासात गहाळ झाला होता तर त्यांचा ओपो कंपनीचा मोबाईल फोन हा घोडबंदर रोड, ठाणे येथील कामाच्या ठिकाणी कोठेतरी गहाळ झाला असल्याची माहीती दिली. फिर्यादी यांचेकडे त्यांनी जबरी चोरीचा खोटा गुन्हा पोलीस ठाण्यात का दाखल केला? याबाबत सखोल तपास केला असता फिर्यादी यांचे गेल्या ०७ ते ०८ महिन्यात वैयक्तिक हलगर्जीपणामुळे ०२ महागडे ॲंड्रॉईड मोबाईल फोन गहाळ झाले होते. त्याबाबत फिर्यादी यांचे आई-वडील हे फिर्यादी हे नमुद मोबाईल फोन विक्री करतात असा संशय घेत होते, त्यामुळे फिर्यादी यांनी आईवडील यांची जाणीवपूर्वक दिशाभुल करणेकामी काशीमीरा पोलीस ठाणे येथे दि. २०/१२/२०२१ रोजी उपरोक्त प्रमाणे ०२ मोबाईल फोन जबरी चोरी झालेबाबत खोटा बनाव करुन गुन्हा नोंद केला आहे असे गुन्हयाचे तपासात निष्पन्न झाले आहे.

सदरची कामगिरी श्री. अमित काळे, पोलीस उपआयुक्त परीमंडळ-०१, श्री विलास सानप, सहाय्यक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग, मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.निरी. श्री. संजय हजारे व गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी सपोनि/महेंद्र भामरे व सहकारी अंमलदार नेम. काशिमीरा पोलीस ठाणे यांनी केलेली आहे.